# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.12.2025** **वारःसोमवार**

---

१.पंतप्रधान आजपासून जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर
२.भाजपच्या कार्यकारी अध्यक्षपदी बिहारचे नितीन नबीन यांची निवड
३.भारतीय रेल्वे संपूर्ण ब्रॉडगेज जाळ्याचं विद्युतीकरण पूर्ण करण्याच्या मार्गावर
४.ऑस्ट्रेलियात झालेल्या गोळीबारांत १५ जण ठार आणि ४२ जण जखमी
आणि
५.भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान मर्यादित २० षटकांच्या क्रिकेट सामन्यांत पाहुण्या संघावर भारताचा विजय, भारतीय संघ २-१ असा आघाडीवर

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात, ते जॉर्डनला भेट देतील आणि दोनही देशांदरम्यान द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेण्यासाठी राजे अब्दुल्ला इब्न अल हुसेन यांची भेट घेतील. भारत आणि जॉर्डनदरम्यानचे परस्पर विश्वास, राजकीय, आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रातील उच्चस्तरीय सहकार्य याबाबत चर्चा अपेक्षित आहे. जॉर्डनमध्ये १७ हजारपेक्षा अधिक भारतीय नागरिक कापड, बांधकाम, उत्पादन आणि इतर क्षेत्रात कार्यरत आहेत.

पंतप्रधान उद्या इथिओपियाला जाणार आहेत, हा त्यांचा पहिलाच इथिओपिया दौरा आहे. या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात ते ओमानला भेट देतील आणि सुलतान हैथम इब्न तारिक यांना भेटतील. दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेला ७० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही ओमान भेट महत्वाची मानली जात आहे. पंतप्रधानांची ही भेट भारत-जॉर्डन संबंधांसाठी अभिमानाचा आणि द्विपक्षीय संबंधांना चालना देणारा क्षण असल्याची भावना भारतीय समुदायाचे सदस्य जॉबी मॅथ्यू यांनी व्यक्त केली आहे. राजे अब्दुल्ला इब्न अल हुसेन यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी आजपासून जॉर्डनच्या हाशेमाइट राज्याचा द्विपक्षीय दौरा करणार आहेत.

**वल्लभभाई पटेल**

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची आज पुण्यतिथी आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे, राष्ट्रीय एकतेचे प्रतिक, मजबूत भारताचे शिल्पकार लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना पुण्यतिथी निमित्त नमन करत असल्याचं गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरील संदेशात आदरांजली वाहताना म्हटलं आहे.

**<u>राष्ट्रपती ऊर्जा</u>**

ऊर्जेची बचत करणं हाच ऊर्जेचा सर्वात पर्यावरणस्नेही आणि विश्वसनीय स्रोत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिनी केलं. या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कारानं राष्ट्रपतींच्या हस्ते काल नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल, ऊर्जा तसंच नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<u>रेल्वे-एनओए</u>**

भारतीय रेल्वे संपूर्ण ब्रॉडगेज जाळ्याचं विद्युतीकरण पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे, २५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ९९ टक्क्यांहून अधिक विद्युतीकरण पूर्ण झालं आहे. अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने काल दिली. २०१९ ते २०२५ दरम्यान ३३ हजार किलोमीटरहून अधिक मार्गाचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. या कालावधीत विद्युतीकरण झालेले एकूण अंतर जर्मनीच्या संपूर्ण रेल्वे नेटवर्कच्या अंतराइतके आहे.

**<u>भाजपा-अध्यक्ष-डीडी</u>**

भाजपच्या कार्यकारी अध्यक्षपदी बिहारचे नितीन नबीन यांची निवड झाली आहे.  भाजपाच्या संसदीय मंडळानं ही नियुक्ती केल्याचं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुणसिंग यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात काल जाहीर केलं.  नितीन नबीन सध्या बिहार मंत्रिमंडळात मंत्री असून ते जे पी नड्डा यांच्याकडून अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारतील. पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजप नेते नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं अभिनंदन केलं आहे.

SIR

मतदार यादीच्या विशेष पुर्नरिक्षण कार्यक्रम अर्थातSIR वरून गोंधळ निर्माण केल्याचा आरोप करत भाजपाने काल काँग्रेसवर टिका केली. नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत बोलताना भाजपाचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी पक्षाची भुमिका स्पष्ट केली. संसदेत निवडणूक सुधारणांबाबत व्यापक चर्चा आधीच झाली आहे. या चर्चेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांना मुद्देसूद उत्तरे दिली आहेत. असंही त्यांनी सांगितलं. काँग्रेसने काल दिल्लीच्या रामलीला मैदानात निवडणूकीसंदर्भातील मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित करतमोर्चा काढला. अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी या सभेला संबोधित केलं.

**<u>ऑस्ट्रेलिया</u>**

ऑस्ट्रेलियातील बोंडी समुद्रकिनारी ज्यू नागरिकांच्या हनुका या जेविश महोत्सवा दरम्यान काल झालेल्या गोळीबारातील मृतांची संख्या आता १५ झाली आहे. दोन पोलीस अधिकाऱ्यांसह ४२ जण जखमी झाले आहेत. हा दहशतवादी हल्ला असल्याचं ऑस्ट्रेलियाच्या पोलीसांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्याबद्दल तिव्र दु:ख व्यक्त केलं आहे, या दुःखाच्या वेळी भारत ऑस्ट्रेलियाच्या जनतेसोबत उभा आहे. असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. हे आरोपी हल्लेखोर नात्याने वडील आणि मुलगा आहेत. यापैकी वडील मारले गेले असून मुलगा जखमी आहे.

**<u>व्हिसा</u>**

अमेरिकन सरकार आजपासून H-1B आणि H-4 व्हिसा अर्जदारांची अतिरिक्त तपासणी आणि पडताळणी सुरू करणार आहे. यामध्ये त्यांच्या सोशल मीडिया प्रोफाइलची तपासणीदेखील समाविष्ट आहे. १५ डिसेंबरपासून सर्व H-1B अर्जदार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या ऑनलाइन संदेशांचा आढावा घेतला जाईल, असं एका नवीन आदेशात परराष्ट्र व्यवहार विभागानं म्हटलं आहे.

**<u>खंडन</u>**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना त्यांच्या समर्थकांना भडकावणारी विधानं करण्यासाठी नवी दिल्लीमधून प्रोत्साहन मिळत असल्याच्या बांगलादेशमधील अंतरिम सरकारनं एका निवेदनाद्वारे केलेल्या दाव्याचं भारतानं स्पष्टपणे खंडन केलं आहे. याबाबत प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे की भारतानं बांगलादेशमध्ये शांततापूर्ण वातावरणात मुक्त, निष्पक्ष, समावेशक आणि विश्वासार्ह निवडणुका घेण्याच्या बाजूने आपली भूमिका सातत्यानं पुन्हा पुन्हा मांडली आहे. बांगलादेशचं अंतरिम सरकार शांततापूर्ण निवडणुका घेण्यासह अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करेल, अशी भारताला आशा असल्याचं या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>अधिवेशन-धनंजय-वानखेडे</u>**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन काल संस्थगित करण्यात आलं. विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या २३ फेब्रुवारीपासून मुंबईत होईल, अशी घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

**<u>निवडणूक</u>**

तेलंगणा राज्यातील ग्रामपंचायत निवडणूकीसाठी काल दुसऱ्या टप्प्यात ८५ पुर्णांक ८६ टक्के मतदान झालं. ५४ लाखापेक्षा जास्त मतदार असलेल्या या टप्प्यासाठी एकंदर ४६ लाखापेक्षा अधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. काही मतदारसंघ वगळता सर्व पदांचे निकाल आज जाहीर होतील. दुसऱ्या टप्प्यात ३ हजार ९११ सरपंच आणि २९ हजार ९१७ प्रभागसदस्य या पदांसाठी निवडणूक घेण्यात आली.

**<u>मेस्सी-पूल</u>**

अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आज त्याच्या GOAT इंडिया दौऱ्याच्या चौथ्या आणि अंतिम टप्प्यासाठी नवी दिल्लीत पोहोचेल.

अरुण जेटली मैदानावर मुख्य कार्यक्रम होणार आहे. यावेळी मेस्सी तीन युवा ट्रॉफी जिंकणाऱ्या मिनर्वा अकादमीच्या संघांचा सत्कार करणार आहे. तसंच काही मान्यवर खेळाडू फुटबॉलचा सामना देखील खेळणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, महाराष्ट्र सरकारने काल मुंबईत मेस्सीच्या उपस्थितीत 'प्रोजेक्ट महादेव' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचे उद्घाटन केलं. राज्यातल्या १३ वर्षांखालील फुटबॉलपटूंना जागतिक दर्जाचं प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती देण्याच्या या उपक्रमाचा उद्देश आहे. वानखेडे मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाला क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, फुटबॉलपटू सुनील छेत्री, अभिनेता टायगर श्रॉफ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, कोलकाता इथं, लिओनेल मेस्सीच्या भेटीनंतर प्रेक्षकांच्या नाराजी व्यक्त करण्याच्या घटनेसंदर्भात निवृत्त न्यायमूर्ती आशिम कुमार रे यांच्या नेतृत्वाखालील चौकशी समितीच्या सदस्यांनी काल सॉल्ट लेक इथल्या युवा भारती क्रीडांगणाला भेट दिली. या कार्यक्रमाचे आयोजकांना १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान काल धरमशाला इथं झालेल्या मर्यादित २० षटकांच्या क्रिकेट सामन्यांत भारताने दक्षिण आफ्रिकेवर सात गडी राखून विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने १५ षटकं आणि ५ चेंडूत तीन बाद १२० धावा केल्या. तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाने निर्धारित २० षटकांत ११७ धावा केल्या. कर्णधार एडेन मार्करामने सर्वाधिक ६१ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंग, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. या विजयासह, भारतीय संघ पाच सामन्यांच्या मालिकेत
२-१ असा आघाडीवर आहे. मालिकेतील चौथा सामना बुधवारी लखनौमध्ये खेळला जाईल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.